VOL- X | ISSUE- VII | JULY | 2023 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.367 | ISSN 2349-638x

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार

**प्रा. डॉ. पवार अविनाश विलासराव**
सहयोगी प्राध्यापक
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
जयक्रांती वरिष्ठ महाविद्यालय, लातूर
Email Id :- pavinash83@gmail.com

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म 14 एप्रिल 1891 मध्ये मध्य प्रदेशातील महू येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव रामजी व आईचे नाव भिमाबाई होते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे मूलभूत आर्थिक विचार आजही खूप महत्त्वाचे आणि अनेक प्रश्नांची सोडवणूक करणारे आहेत. गुलामाला त्यांच्या गुलामगिरीची जाणीव करून द्या म्हणजे तो बंड करून उठेल अशी सिंहगर्जना डॉ. आंबेडकर यांनी करून भारतातील कोट्यावधी दलित, शोषित, पीडित, आदिवासी, अस्पृश्य, शेतकरी, शेतमजूर, भूमिहीन यांना सामाजिक , आर्थिक राजकीय, शैक्षणिक गुलामगिरीतून मुक्त करण्याचे अभूतपूर्व कार्य केले. समाजापुढील सामाजिक प्रश्नांचा गांभीर्याने अभ्यास करून ते सामाजिक प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेला आहे. भारतरत्न डॉ. आंबेडकर समाज क्रांतिकारक, धर्मशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, नीतीशास्त्र, मानवंशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र या विषयाचे व्यासंगी अभ्यासक कायदे पंडित होते. परंतु डॉ. आंबेडकर सर्वसामान्यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून अधिक परिचित असल्याने अर्थशास्त्रज्ञ म्हणून असणारी त्यांची भूमिका दुर्लक्षित राहिली आहे . डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक जागतिक अर्थतज्ञ होते. एम ए, पीएच.डी, डॉक्टर ऑफ सायन्स या तिन्ही पदव्या त्यांनी अर्थशास्त्र विषयांमधूनच घेतलेल्या आहेत. बाबासाहेब आंबेडकर यांनी जे शोधनिबंध लिहिले आहेत. त्याकाळी त्यांनी जी भाषणे केली. वर्तमानपत्रातून जे लेख लिहिले. स्वतंत्र मजूर पक्षाचा जो जाहीरनामा मांडला आणि अर्थशास्त्रावरील जे पुस्तके लिहिली त्यामध्ये त्यांचे आर्थिक विचार स्पष्ट होतात. आंबेडकर यांचे आर्थिक विचार काय आहेत आणि सध्याच्या परिस्थितीमध्ये त्यांचे आर्थिक विचार समाजाला कसे उपयोगी आहेत याचे विश्लेषण या शोधनिबंधामध्ये केलेले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

1. **डॉ.** बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार समजून घेणे.
2. सद्य स्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार कसे उपयोगी आहेत ते अभ्यासणे.

**संशोधनाची गृहितके:-**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक महान अर्थशास्त्रज्ञ आहेत.
2. सद्य स्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार अनेक प्रश्न सोडविण्यासाठी उपयोगी आहेत.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी द्वितीय माहितीचा वापर करण्यात आलेला आहे. यामध्ये संदर्भ ग्रंथ नियतकालिके मासिके संशोधन पर लेख इत्यादीचा आधार घेतला आहे.

**विषय विवेचन :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक जागतिक दर्जाचे महान अर्थशास्त्रज्ञ असुन त्यांचे आर्थिक विचार आर्थिक संपन्नता मिळवून देणारे आणि देशाचा आर्थिक कणा मजबूत करणारे आहेत.

**1) एम.ए.शोधनिबंधात भारताच्या लुटीचे आर्थिक चित्रन :-**

1915 मध्ये एम ए च्या प्रबंधनाचा विषय “ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि वित्त” (ऍडमिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ ईस्ट इंडिया कंपनी ) हा होता. या

शोधनिबंधात त्यांनी ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि वित्त व्यवस्था यांच्यामध्ये 1792 ते 1858 या काळात कसे फेरबदल होत गेले आणि त्यातून भारतीय जनतेवर कसा अन्याय झाला याचे विदारक आर्थिक चित्र डॉ. आंबेडकरांनी उभे केले आहे. व्यापाराच्या निमित्ताने आलेल्या ईस्ट इंडिया कंपनीने भारतीय जनतेची प्रचंड पिळवणूक केली शोषण केले. या काळात कंपनीचा एकूण महसूल 55 लाख पौंड वरून 317 लाख पोंड इतका वाढला. विशेष म्हणजे यापैकी 54 टक्के वाटा जमिनीवरील कराचा होता. अत्यंत जाचक प्रकार च्या या करा मुळे शेतकरी वर्गाची फार मोठी पिळवणूक होत होती. कर्जाच्या बाबतीत कर्जाची ही रक्कम 70 लाख पौंड वरून 607 लाख पौंड झाली. 1858 मध्ये कंपनी बरखास्त झाल्यावर 693 लाख पोंड कर्जाचा बोजा भारतावर टाकून अन्याय केला असे मत आंबेडकरांनी या शोधनिबंधात मांडले. तसेच महसूल उत्पन्नाचा विनियोग लोकांच्या कल्याणासाठी लोकांच्या विकासासाठी करावा लागतो पण कराद्वारे शेतकऱ्यांचे शोषण करून मिळवलेल्या महसूल उत्पन्नाचा विनियोग करताना मात्र भारतीय जनतेच्या विकासासाठी अत्यंत नगण्य रक्कम खर्च करण्यात आली हे त्यांनी यातुन स्पष्ट केले.

2) **पीएच.डी प्रबंध वित्त आयोगाचा मुलाधार :-**

1924 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पीएच.डी साठी " ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्ताचा उगम" ( दि व्हॅल्युएशन ऑफ फायनान्स इन ब्रिटिश इंडिया ) हे प्रबंध लिहिला. या प्रबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 1833 ते 1921 या काळात ब्रिटिश केंद्र सरकार आणि त्यावेळी ची घटकराज्ये यांच्यातील आर्थिक संबंध कसे विकसित होत गेले त्याविषयी विचार व्यक्त केले. हा ग्रंथ एक ऐतिहासिक संदर्भ ग्रंथ म्हणून तर महत्त्वाचा आहेच पण प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रा. सेलिंगमन या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हणतात "माझ्या माहितीप्रमाणे आत्तापर्यंत कुठेही केंद्र सरकार व घटक राज्य यांच्यातील आर्थिक संबंधाची एवढी विस्तृत आणि सखोल विमांसा करण्यात आलेली नाही" या ग्रंथाचे महत्त्व बदललेल्या आर्थिक परिस्थिती देखील कमी झालेले नाही. भारताच्या राज्यघटनेनुसार दर पाच वर्षांनी केंद्र सरकार व राज्य सरकार यांचे वित्तीय संबंध ठरविण्यासाठी वित्त आयोग नेमले जाते. कराच्या रूपाने सरकारकडे जमा होणाऱ्या महसुलापैकी केंद्र सरकार आणि घटक राज्य सरकार यांच्या दरम्यान कसे वाटप व्हावे याच्या शिफारशी करण्याचे काम वित्त आयोगाकडून केले जाते. मात्र त्याचा मुलाधार हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हाच ग्रंथ आहे.

3) **डॉक्टर ऑफ सायन्स अर्थसंकल्पीय तुट चलन फुगवटा, भाववाढ यासारख्या प्रश्न :-**

लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये डी एस्सी साठी लिहिलेला "रूपयांचा प्रश्न : उगम आणि उपाय" ( दि प्रॉब्लेम ऑफ रुपी इट्स ओरिजन अँड सोल्युशन) हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा तिसरा अत्यंत महत्त्वाचा असा ग्रंथ आहे. हा प्रबंध डॉक्टर ऑफ सायन्सच्या पदवीसाठी लिहिलेल्या ग्रंथ आहे. या प्रबंधात त्यांनी भारतीय रुपयाची उत्क्रांतीची ऐतिहासिक मीमांसा सादर करून भारतासाठी आदर्श चलन पद्धती कोणती यावर विचार मांडले आहेत. यात त्यांनी स्वर्णविनिमय परिमाणाचा विरोध केला स्वर्ण विनिमय पद्धतीत कागदी चलनाचा वापर होतो. त्यामुळे ती लवचिक आहे. स्वर्ण विनिमय पद्धतीमुळे चलन निर्मितीवर मर्यादा राहणार नाही व त्याचा परिणाम आवश्यकतेपेक्षा जास्त चलन निर्मिती होते त्यामुळे भाववाढ होऊन रुपयाची किंमत घसरेल व विनिमयाचे साधन म्हणून रुपयाचे स्थान अस्थिर होईल असे स्पष्ट केले. आणि आज आपणाला हेच दिसते आज केंद्र सरकारची अर्थसंकल्पीय तूट प्रचंड गतीने वाढत आहे. ही तूट भरून काढण्यासाठी रिझर्व बँकेला अधिकाधिक पतपुरवठा करावा लागत आहे. त्यामुळे चलन फुगवटा व मोठ्या प्रमाणावर भाववाढ होत आहे. भाववाढीमुळे सर्वसामान्य लोकांचे फार मोठ्या प्रमाणात शोषण होते आणि या भाववाढीचा फायदा उत्पादक वर्गाला होतो आणि त्यामुळे आर्थिक विषमतेत वाढ होते आणि सध्या हेच आपणाला चित्र दिसत आहे. चलन निर्मितीच्या क्षमतेवर परिणामकारक अंकुश ठेवण्याचा डॉक्टर आंबेडकरांनी 1921 साली मांडलेली भूमिका एवढ्या प्रदीर्घ कालावधीनंतर ही महत्त्वाची वाटत आहे.

4) **शेती विषयक विचार :-**

शेतीला भारतीय अर्थव्यस्थेचा कणा समजला जातो. भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी जवळपास 56% लोकसंख्या शेती आणि शेतीशी संबंधित उद्योगांमध्ये गुंतलेली आहे. आज शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. कर्जबाजारीपणा वाढलेला आहे. 30 - 35 वर्ष होऊन देखील शेतकऱ्यांच्या मुलांची लग्न होत नाहीत याचे एकच उत्तर

आहे. शेती ही किफायतशीर राहिलेली नाही. इतर देशाच्या तुलनेत भारतीय शेतीची उत्पादकता कमी आहे. त्याचे कारण विभाजन व तुकडीकरण हे आहे असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे होते. वाढत्या लोकसंख्येमुळे व वारसा हक्कामुळे जमिनीची विभागणी तुकडीकरण होऊन लहान धारण क्षेत्राचे प्रमाण वाढत आहे. आणि त्यामुळे शेती क्षेत्रात छुपी बेकारी जास्त आहे. भारतीय शेतीचे प्रश्न सोडवण्यासाठी सामूहिक शेती, औद्योगीकरण हे उपाय सुचविले आहेत. त्या काळात शेती विषयक विचार आजही योग्य वाटतात.

5) **जातीव्यवस्था अस्पृश्यता या सामाजिक समस्यांचे आर्थिक विश्लेषण :-**

जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता यासारख्या सामाजिक समस्यांचे आर्थिक दृष्टिकोनातून विश्लेषण करणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर हे पहिलेच अर्थशास्त्रज्ञ होते. जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता या सामाजिक समस्या मुळे आर्थिक असमानता निर्माण होते. त्यामुळे समाजात विषमता वाढते आणि आर्थिक समता निर्माण होत नाही. त्यातुनच शोषण होऊन. वंचित वर्गाचा विकास होत नाही त्यामुळे सामाजिक कल्याण होत नाही. आणि आर्थिक विकासात बाधा निर्माण होते असे डॉ.बाबासाहेबांनी दाखवून दिले. डॉ बाबासाहेबांच्या विचारांचे हेच सूत्र पकडून अलीकडील काळात प्रा. गुन्नर मिडाल यांनी जातीव्यवस्थेसारख्या सामाजिक समस्येमुळे आर्थिक विकासावर होणाऱ्या दुष्परिणामांचे विस्तृत विश्लेषण " एशियन ड्रामा " या आपल्या ग्रंथात केले आणि याच कार्याबद्दल प्रा. गुन्नर मिडाल यांना अर्थशास्त्राचा नोबेल पारितोषिक मिळाले यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचारांची ताकद आपल्या लक्षात येते.

6) **भांडवलशाही अर्थव्यवस्था**

अनेक देशांनी आज भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा स्वीकार केलेला आहे. भांडवलदारांचा उद्देश हा जास्तीत जास्त नफा कमवणे हा असतो. आणि त्यामुळे संपत्तीचे केंद्रीकरण एका विशिष्ट वर्गाकडे होऊन सर्वसामान्य लोकांचे शेतकरी शेतमजूर कामगार यांचे शोषण या भांडवलशाली अर्थव्यवस्थेमध्ये होतात. त्यामुळे त्यांना संपत्ती चे केंद्रीकरण करणारी राजकीय स्वातंत्र्याला बाधा आणणारी, आर्थिक विषमता वाढवणारी, भांडवलशाही अर्थव्यवस्था नको होती आणि व्यक्ती स्वातंत्र्याला बाधा आणणारी अशी समाजवादी अर्थव्यवस्था ही नको होती तर त्यांना व्यक्ती स्वातंत्र्य देणारा सामाजिक न्याय समता प्रस्थापित करणारा राज्य समाजवाद हवा होता. राज्य समाजवादात लोकांच्या कल्याणासाठी सरकारने अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप करणे अनिवार्य आहे. त्यामुळे उत्पादन वाढवून सामाजिक न्याय प्रस्थापित होईल. संपत्तीचे केंद्रीकरण होणार नाही आर्थिक विषमता वाढणार नाही. सर्व सामान्य लोकांचे हित होईल सामाजिक न्याय प्रस्थापित होईल म्हणून राज्य समाजवाद खूप महत्त्वाचा आहे परंतु अलीकडच्या कालखंडामध्ये खाजगीकरण मोठ्या प्रमाणात वाढवून सामाजिक न्यायाला बाधा निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे.

7) **शिक्षण विषयक विचार :-**

शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना ते म्हणतात शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. जो प्राशन करेल तो वाघासारखा गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. म्हणून शिक्षण घेतले पाहिजे "वाचाल तर वाचाल" याप्रमाणे शिक्षण मानवी जीवनात किती महत्वाचे आहे हे त्यांनी पटवून दिले. मंदिरात जाणाऱ्या लोकांच्या रांगा जेव्हा वाचनालय कडे जातील त्या दिवशी आपल्या देशात महाशक्ती बनण्यापासून कोणी रोखू शकणार नाही एवढे महत्त्व शिक्षणामध्ये आहे. जर तुमच्याकडे दोन रुपये असतील तर एक रुपयाची भाकर आणि एक रुपयाचे पुस्तक घ्या कारण भाकर तुम्हाला जगण्यास मदत करेल तर पुस्तक तुम्हाला कसं जगायचं ते शिकवेल. शिक्षणामुळे कौशल्यात वाढ होऊन कार्यक्षमता वाढून आर्थिक विकास होण्यास मदत होते. सामाजिक न्याय आर्थिक समता सामाजिक कल्याण प्रस्थापित करण्यासाठी शिका संघटित व्हा संघर्ष करा हा मूलमंत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपणाला दिला आहे.

8) **कामगारांच्या आर्थिक प्रश्नासंबंधी :-**

भारतातील कामगार वर्गाचे आर्थिक प्रश्न सोडवण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सतत कार्यशील राहिले आहेत. भांडवलदारांचा उद्देश नफा कमवण्याचा असतो आणि त्यामुळे कामगार वर्गाचे शोषण करून भांडवलदार नफा कमवत असतो त्यांची पिळवणूक करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांमध्ये अंतर्गत भेदभाव धोकादायक आहे हे दाखवून देऊन कामगारांसाठी विविध कायदे धोरणे तयार करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कार्य केले आहे.

**सारांश** :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक महान अर्थशास्त्रज्ञ आहेत. त्यांचे मूलभूत आर्थिक विचार नेहमी खूप महत्त्वाचे आणि अनेक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी उपयोगी पडले आहेत. .एम ए साठी लिहिलेला शोधनिबंध भारताची लूट कशी झाली व ईस्ट इंडिया कंपनीकडून लोकांच्या कल्याणासाठी महसुली उत्पन्नाचा कसा नगण्य लोकांच्या कल्याणासाठी केला याचे चित्रण त्यांनी केले. पीएचडी साठी लिहिलेला ग्रंथ केंद्र व राज्य सरकार यांच्यात उत्पन्नाची वाटणी कशी करायची यासाठी उपयोगी ठरतो. म्हणून वित्त आयोगाचा आधार याच ग्रंथाला मानले जाते. चलनवाढ , भाववाढ पैशाच्या मुल्यामधील अस्थिरता सारख्या प्रश्नांवर प्रकाश टाकणारा रूपयाचा प्रश्न हा ग्रंथ आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे आणि वारसाहक्कामुळे शेतीचे धारण क्षेत्र कमी होत आहे. त्यामुळे भारतीय शेती ही किफायतशीर राहिली नाही. त्यासाठी सामूहिक शेती आणि औद्योगीकरणाची गरज आहे. त्याशिवाय शेतीचे प्रश्न सुटणार नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक हे विचार आजही महत्त्वाचे वाटतात आणि शेतीमधील प्रश्न सोडवण्यासाठी उपयोगी आहेत. जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता या सामाजिक समस्या आर्थिक विकासात मध्ये बाधा निर्माण करतात हे सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखवून दिले. त्यामुळे देशाचा विकास करण्यासाठी या समस्यांचे निराकरण करणे गरजेचे आहे हे लक्षात येते. भांडवलशाही अर्थव्यवस्थेमुळे कामगारांचे शोषण होते सामाजिक न्याय प्रस्थापित होत नाही तर समाजवादामुळे आर्थिक स्वातंत्र्याला बाधा येते त्यामुळे राज्य समाजवाद खूप महत्त्वाचा आहे हे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाला दाखवून दिले. आर्थिक विकासामध्ये शिक्षण खूप महत्त्वाचे आहे. शिक्षणातून कौशल्यात वाढ होते आणि गुलामगिरीची जाणीव होते. म्हणून शिक्षण घेतले पाहिजे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार आजही अतिशय महत्त्वाचे आहेत.

**संदर्भ** :-

1. प्रा. डॉ. ए. आर. रायखेलकर - आर्थिक विचारांचा इतिहास , विद्या बुक्स पब्लिकेशन, औरंगाबाद.
2. प्रा. डॉ. जी. व्ही चव्हाण, माधव हाळदेकर – आर्थिक विचारांचा इतिहास
3. प्रा. विजय कवीमंडळ - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार, श्री मंगेश प्रकाशन नागपूर
4. https://www.aiirjournal.com/uploads/Articles/2020/06/4583_24.Dr.D.V.Hargile.pdf
5. https://bmvmorshi.ac.in/pdf/Criterion_III/%E0%A4%A1%E0%A5%89.%20%E0%A4%AC%E0%A4%BE%E0%A4%AC%E0%A4%BE%E0%A4%B8%E0%A4%BE%E0%A4%B9%E0%A5%87%E0%A4%AC%20%E0%A4%AF%E0%A4%BE%E0%A4%82%E0%A4%9A%E0%A5%87%20%E0%A4%86%E0%A4%B0%E0%A5%8D%E0%A4%A5%E0%A4%BF%E0%A4%95%20%E0%A4%B5%E0%A4%BF%E0%A4%9A%E0%A4%BE%E0%A4%B0.pdf
6. डॉ. भालचंद्र मुणगेकर, डॉ. आंबेडकरांचे भारतीय शेतीविषयक विचार.